504, Narayan Udyog Bhavan, Lalbaug Ind. Estate, Ganesh Nagar, Lalbaug, Mumbai - 12.
Telefax : + 91-22-24712571 / Cell: 098204 55403 / Website : www.mediaonepr.com
E-mail: ganesh_gargote@yahoo.com, ganesh.gargote072@gmail.com



# अफलातून विनोदाची धामधूम

'ऑल द बेस्ट'... रंगभूमीवरील अफलातून गाजलेलं नाटक. देवेंद्र पेम दिग्दर्शित या नाटकाने मराठी रसिकांच्या मनात अढळ स्थान मिळवत चित्रपटसृष्टीला अनेक हरहुन्नरी कलावंत दिले. मराठीसह प्रादेशिक रंगभूमीचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या देवेंद्र पेम यांच्या याच कल्पक दिग्दर्शनाची जादू आता चित्रपटातून पहायला मिळणार आहे. 'इच्छापूर्ती प्रॉडक्शन' निर्मिती संस्थेद्वारे रविंद्र वायकर हे महत्त्वपूर्ण नाव सिनेसृष्टीत दाखल झाले असून त्यांनीच 'धामधूम' चित्रपटाची निर्मिती केली आहे. येत्या ११ ऑक्टोबरला हा विनोदी चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होतोय. नामांकित कलाकारांची अदाकारी, विषयातील वैविध्य, तांत्रिक दृष्टयाही सक्षम असलेला मराठी चित्रपट पाहणे प्रेक्षकांसाठी नेहमीच एक पर्वणी असते. रसिकांच्या याच पसंतीची दखल 'धामधूम'मध्ये घेण्यात आली आहे. 'इच्छापूर्ती प्रॉडक्शन' निर्मित, 'धामधूम' चित्रपटाची प्रस्तुती देवेंद्र पेम यांच्या 'अनामय प्रॉडक्शन'ने केली आहे.

कथेच्या अनुषंगाने योग्य कलाकारांची निवड झाली तर त्या कलाकृतीला नक्कीच वेगळी उंची लाभते. हेच सार्थ ठरवित सध्याच्या आघाडीच्या कलाकारांना एकत्र आणत दिग्दर्शक देवेंद्र पेम यांनी 'धामधूम' ही दर्जेदार विनोदी कलाकृती साकारली आहे. भरत जाधव, सिध्दार्थ जाधव, मृण्मयी देशपांडे, स्मिता शेवाळे, सयाजी शिंदे, केतकी दवे, आनंद अभ्यंकर, मुग्धा शहा, विनय आपटे, मेघना वैद्य, उदय टिकेकर, आसावरी जोशी, अश्विनी आपटे, जयवंत वाडकर, किशोर प्रधान, विजू खोटे अशा अनेक मातब्बर कलावंतांच्या भूमिकांमुळे रविंद्र वायकर निर्मित हा चित्रपट अधिक मनोरंजक झाला आहे.

एकसारख्या दिसणा-या दोन व्यक्ती म्हणजेच 'डबल रोल' मुळे होणारा गोंधळ कथेत उतरवणं तसं सोपं असतं पण सारख्या नावामुळे उडणारे गोंधळ कथेत आणि पटकथेत यशस्वीपणे उतरवणं थोडसं आव्हानात्मक असतं आणि हे आव्हान पेलण्यात 'धामधूम'चे लेखक दिग्दर्शक देवेंद्र पेम यशस्वी झाले आहेत. 'धामधूम'ची कथा 'मधू' या नावाभोवती फिरते. ही कथा आहे मधुकरची. जो 'मधू' नावाच्या मुलीवर प्रेम करत असतो आणि तिच्याशी लग्न करण्याची त्याची इच्छा असते. मधुकरची ही ड्रीमगर्ल 'मधू' म्हणजेच मधुरा नावाची मुलगी आहे असं मधुकरच्या वडिलांना वाटत असतं आणि ते मधुरालाच आपली भावी सून समजतात, अशातच मधुर नावाच्या दुस-या नायकाची एण्ट्री होते आणि गोंधळ अधिकच वाढत जातो. विशेष म्हणजे हा गोंधळ या चौघांपुरताच मर्यादित न राहता तो त्यांच्या कुटुंबियांपर्यंत पोहचतो आणि मग एकच धमाल उडते. या 'मधू' प्रकरणामुळे चार कुटुंबांमध्ये अनेक गैरसमज निर्माण होतात आणि त्यातूनच प्रेमाची मजेशीर धामधूम उलगडत जाते. आता यातील मधुकर, मधू, मधुरा आणि मधुर यांच्या भूमिका कुणी रंगविल्या आहेत हे चित्रपटगृहात जाऊन बघणं जास्त मजेशीर ठरेल. लग्नाभोवती फिरणारा 'धामधूम' चित्रपटाचा हा माहोल प्रेक्षकांना चित्रपटाच्या प्रेमात पडायला लावेल असाच आहे.

गीतकार गुरु ठाकूर यांनी लिहिलेल्या यातील गीतांना अवधूत गुप्तेंनी सुमधूर संगीताची साथ दिली आहे. चित्रपटातील 'तू वळून पाहिले डोळयाला भिडला डोळा..' हे युगल गीत लोकप्रिय गायक शान व कीर्ती किल्लेदार यांनी गायले आहे, तर 'धामधूम' हे शीर्षक गीत अवधूत गुप्ते, स्वप्निल बांदोडकर, आदर्श शिंदे, जाव्हवी प्रभू-अरोरा यांनी गायले आहे. नृत्यदिग्दर्शक उमेश जाधव आणि राजेश बिडवे यांनी या गीतांवर कोरिओग्राफी केली आहे. चित्रपटाचे छायांकन राजा सटाणकर, कला दिग्दर्शन संतोष फुटाणे यांचे तर संकलन आनंद दिवाण यांचे आहे. चित्रपटाचे कार्यकारी निर्माता रत्नकांत जगताप आहेत. निखळ हास्याचा अनुभव देणारा 'धामधूम' ११ ऑक्टोबरला प्रदर्शित होतोय. प्रेक्षक या चित्रपटाचे जोरदार स्वागत करतील हे निश्चित!